तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, ७ जानेवारी २०२६

आतील पानावर

पान २– मला कधीच प्रेम झालं नाही!
पान ३ – मलायकाला लवकर लग्न केल्याचा...
पान ४ – नयनताराचा 'टॉक्सिक' अवतार
पान ५ – फिटनेस अन् माझा ३६ चा आकडा
पान ६ – नव्या वर्षात प्रदर्शित होणार...



# 'कल्कि २'मध्ये प्रियांका चोप्रा



'कल्कि २८९८ एडी' हा मागील वर्षातील सुपरहिट चित्रपट होता, याचे दिग्दर्शक नाग अश्विन यांनी केले होते. चित्रपटात प्रभास, अमिताभ बच्चन यांच्यासोबत दीपिका पदूकोन मुख्य भूमिकेत होती. आता कल्कि २ चित्रपटाची तयारी सुरू असून यात दीपिका सामील नसल्याचे स्पष्ट झाले आहे. दीपिकाच्या एक्झिटनंतर प्रियांका चोप्राची चित्रपटात एंट्री झाल्याचे समोर आले आहे. कल्कि २ मधील सर्वात प्रभावी अभिनेत्रीच्या स्वरुपात तिची निवड करण्यात आली आहे. परंतु प्रियांकाकडून यासंबंधी अद्याप पुष्टी देण्यात आलेली नाही. प्रियांका याचबरोबर राजामौली यांच्या चित्रपटात महेश बाबूसोबत काम करत आहे. 'कल्कि २'च्या निर्मात्यांकडून अद्याप प्रियांकाचे नाव घोषित करण्यात आलेले नाही. परंतु तिच्या तारखा चित्रिकरणासाठी जुळवून आणण्याच्या हालचाली सुरु असल्याचे समजते. तर दुसरीकडे दीपिका पदूकोनने निर्मात्यांकडून अधिक मानधन आणि ८ तासांच्या शिफ्टची मागणी केली होती. याचमुळे निर्मात्यांनी तिला हटविण्याचा निर्णय घेतला आहे. सिनेमांसाठी साई पल्लवी त्यांची कायमच आवडती अभिनेत्री राहिली आहे. तर दुसरीकडे साई पल्लवी सध्या 'रामायण' सिनेमात व्यग्र आहे.

तिने संपूर्ण वेळ नितेश तिवारींच्या या सिनेमाला दिला आहे. सिनेमाच्या दुसऱ्या भागाचंही तिचं शूट लवकरच पूर्ण होणार असल्याची चर्चा आहे. यानंतर ती नाग अश्विन यांच्या सिनेमाचं काम पुढील वर्षात करु शकते.

# उर्मिला मातोंडकरने सोडला अभिनय?

नव्वदच्या दशकात आपल्या अभिनयाने आणि सौंदर्याने प्रेक्षकांना वेड लावणारी 'रंगीला गर्ल' अर्थात उर्मिला मातोंडकर गेल्या अनेक वर्षांपासून मोठ्या पडद्यापासून दूर आहे. त्यामुळे उर्मिलाने अभिनय सोडल्याच्या चर्चांना उधाण आलं होतं. पण, आता त्यांना पूर्णविराम मिळाला आहे. कारण, ५१ वर्षीय उर्मिलाने एका मुलाखतीत स्पष्ट केले आहे की, ती अभिनयापासून दूर गेलेली नाही आणि लवकरच एका वेगळ्या अवतारात प्रेक्षकांसमोर येणार आहे. उर्मिला म्हणाली, मी माझ्या कामाच्या बाबतीत नेहमीच निवडक राहिले आहे. जर कोणाला वाटले असेल की मी आता चित्रपट करणार नाही, तर मी कोणालाही दोष देऊ शकत नाही. मात्र, तसे कधीच नव्हते. मी आता पुन्हा एकदा रुपेरी पडद्यावर परतण्यास पूर्णपणे तयार आहे. पुढे ती म्हणाली, आता सेटवर परतण्याची वेळ आली आहे. मला अशा भूमिका करायच्या आहेत, ज्या मी यापूर्वी कधीही केल्या नाहीत.

उर्मिलाचा बॉलिवूडमधील प्रवास थक्क करणारा आहे. तिने १९७७ मध्ये 'कर्मा' चित्रपटातून बालकलाकार म्हणून पदार्पण केलं होतं. 'कर्मा'शिवाय 'जाकूल','मासूम','सूर संगम','भावना','बडे घर की बेटी','तुम्हारे शहर','डकैत' या सिनेमांमध्येही ती बालकलाकाराच्या भूमिकेत दिसली. १९७७ ते १९८८ पर्यंत ती १० सिनेमांमध्ये तिने बालकलाकार म्हणून काम केलं. १९८९ साली ती मल्याळम सिनेमातही झळकली. हिंदी आणि साउथ मिळून ती ६० सिनेमांमध्ये दिसली आहे. १९९१ साली उर्मिलाने सनी देओलच्या 'नरसिम्हा' सिनेमातून मुख्य अभिनेत्री म्हणून पदार्पण केलं. तिचे 'रंगीला', 'सत्या', 'खूबसूरत', 'दीवाने','हसीना मान जाएगी','भूत' असे अनेक सिनेमे गाजले. उर्मिला मध्यंतरी वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत होती. १० वर्ष छोट्या मोहसीन अख्तरसोबत लग्न आणि मग घटस्फोट यामुळे ती प्रसिद्धीझोतात होती. आज वयाच्या ५१ व्या वर्षी उर्मिला ग्लॅमरस दिसते. ती शेवटची २०२२ मध्ये 'डान्स इंडिया डान्स सुपर मॉम्स' या रिॲलिटी शोमध्ये जज म्हणून दिसली होती. आता ती अभिनेत्री म्हणून पुन्हा कॅमेऱ्यासमोर येण्यासाठी सज्ज झाली आहे.




# '३ इडियट्स'च्या सीक्वलमधून शर्मन जोशीचा पत्ता कट?



एकता बॉलिवूडमधील आयकॉनिक चित्रपट '३ इडियट्स'च्या सीक्वलबाबतच्या चर्चा पुन्हा एकदा रंगू लागल्या आहेत. मूळ चित्रपटात महत्त्वाची भूमिका साकारणाऱ्या शर्मन जोशीने अलीकडेच या सीक्वलबद्दल आशा व्यक्त केली. मात्र, अद्याप त्याला कोणतीही अधिकृत माहिती मिळालेली नाही, हे देखील त्याने स्पष्ट केले. शर्मन जोशीने '३ इडियट्स'मध्ये 'राजू रस्तोगी' ही संस्मरणीय भूमिका साकारली होती. चित्रपटात आमिर खान आणि आर. माधवनसोबतची त्याची केमिस्ट्री प्रेक्षकांना खूप आवडली होती. शर्मनने चित्रपटाच्या पुढील भागावर भाष्य केले. जोशी म्हणाला, मला पूर्ण आशा आहे की सीक्वल होईल, पण मला अद्याप याबद्दल कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. '३ इडियट्स २' च्या कथेबद्दल आपल्याला काहीच कल्पना नसल्याचे सांगताना तो म्हणाला, जर या चित्रपटात काही क्षमता असेल, तर फक्त मास्टर राजू सर (राजकुमार हिराणी), अभिजात सर आणि आमिरच यावर काम करतील. शर्मनने तो किस्साही सांगितला जेव्हा त्याला या चित्रपटासाठी विचारण्यात आले होते. तो म्हणाला, मी त्यावेळी जिममध्ये 'सिक्स-पॅक ॲब्स' बनवत होतो, तेव्हा राजू सरांचा फायनल कॉल आला. ते म्हणाले की, आता तू पुढची तीन वर्षे जिमचं तोंडही बघायचं नाहीस. या चित्रपटाने आयुष्यावर केलेल्या परिणामाबद्दल बोलताना तो म्हणाला, जेव्हा कधी मी '३ इडियट्स'चा विचार करतो, तेव्हा माझ्या चेहऱ्यावर आपोआप हसू येते. राजकुमार हिराणी यांनी '३ इडियट्स २' ची स्क्रिप्ट फायनल केली आहे. हा चित्रपट २०२६ मध्ये फ्लोअरवर जाण्याची शक्यता आहे. या सीक्वलमध्ये आमिर खान, करीना कपूर खान, आर. माधवन आणि शर्मन जोशी ही मूळ जोडी पुन्हा एकत्र दिसू शकते. हिराणी अनेक वर्षांपासून या सीक्वलचा विचार करत होते, पण दादासाहेब फाळके यांच्यावरील बायोपिकचे काम थांबवल्यानंतरच त्यांनी या प्रोजेक्टवर पुढे जाण्याचा निर्णय घेतला.

# मला कधीच प्रेम झालं नाही!

कार्तिक आर्यन आणि अनन्या पांडे सध्या 'तू मेरी मैं तेरा मैं तेरा तू मेरी' या चित्रपटामुळे चर्चेत आहेत. या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत असून बॉक्स ऑफिसवरही तो चांगली कामगिरी करत आहे. चित्रपटाच्या प्रमोशनसाठी हे दोन्ही कलाकार 'द ग्रेट इंडियन कपिल शो'च्या नवीन भागात दिसणार आहेत. निर्मात्यांनी एक प्रोमो शेअर केला आहे, ज्यामध्ये कार्तिक आपल्या लव्ह लाइफबद्दल काही गोष्टी सांगताना दिसतोय, जे ऐकून अनन्या पांडे थक्क झाली. लीक झालेल्या प्रोमोमध्ये, अर्चना पूरण सिंग कार्तिकचा चित्रपटातील एक डायलॉग म्हणते की, ज्या मुलीला मी पहिल्यांदा 'आय लव्ह यू' म्हणेन, तीच शेवटची मुलगी असेल जिला मी 'आय लव्ह यू' म्हणेन. अर्चनाने कार्तिकला विचारले की, हे त्याचे वैयक्तिक ब्रीदवाक्य आहे का? यावर उत्तर देताना कार्तिक म्हणाला, मी कधीच कुणाला 'आय लव्ह यू' म्हणालो नाहीये. जेव्हा पहिल्यांदा सांगेन, तेव्हाच सांगेन. हे ऐकून हैराण झालेली अनन्या पांडे विचारते, तर मग आतापर्यंत असं कधीच झालं नाहीये? यावर कार्तिक फक्त हसतो. विशेष म्हणजे, यापूर्वी हे दोन्ही कलाकार एकमेकांना डेट करत असल्याच्या अफवा होत्या, मात्र त्यांनी कधीही यावर अधिकृत भाष्य केले नाही. तू मेरी मैं तेरा मैं तेरा तू मेरी' हा चित्रपट कार्तिक आर्यन आणि अनन्या पांडे यांना २०१९ मधील 'पती पत्नी और वो' नंतर पुन्हा एकदा एकत्र आणतो. या चित्रपटात दिग्गज कलाकार जॅकी श्रॉफ आणि नीना गुप्ता देखील महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. करण जोहरच्या धर्मा प्रोडक्शन्स अंतर्गत बनलेला हा चित्रपट त्याच्या स्टार कास्ट आणि उत्सवांच्या काळात प्रदर्शित झाल्यामुळे बॉक्स ऑफिसवर मोठी कमाई करेल अशी अपेक्षा होती. मात्र, आठवड्याच्या दिवसांत कमाईत मोठी घट झाल्याने, आता सर्वांचे लक्ष याकडे आहे की चित्रपट पकड टिकवून ठेवतो की बॉक्स ऑफिसवर संघर्ष करतो. कार्तिक आर्यनचा आगामी चित्रपट 'नागजिला' असून तो धर्मा प्रोडक्शन अंतर्गत बनत आहे. तसेच तो लव रंजन यांच्या एका अद्याप नाव न ठरलेल्या चित्रपटात दिसणार आहे. याआधी त्याचा 'भूल भुलैया ३' हा चित्रपट सुपरहिट ठरला होता, ज्यामध्ये विद्या बालन आणि माधुरी दीक्षित त्याच्यासोबत होत्या. अनन्याचा शेवटचा चित्रपट 'केसरी चॅप्टर २' होता, ज्यात तिने अक्षय कुमार आणि आर. माधवन यांच्यासोबत काम केले होते. तिचा आगामी प्रोजेक्ट 'कॉल मी बे' सीझन २ हा आहे.



दिल्लीच्या बॉलिवूड अभिनेत्री महिमा चौधरी मुलगी अरियाना चौधरी अलिकडेच 'अरियाना 'नादानियां' चित्रपटाच्या प्रीमियरमध्ये दिसली होती. तिचे अनेक व्हिडिओ देखील सोशल मिडियावर व्हायरल झाले होते. तिच्या सौंदर्याचे आणि स्टाइलचे अनेकांकडून कौतुक करण्यात आले होते. १८ वर्षांची अरियानाने नुकतीच हायस्कूलमधून पदवी प्राप्त केली आहे. मात्र तिचे बॉलिवूड कलाकारांसोबतचे अनेक फोटो समोर आले आहेत. यानंतर आता महिमाने अरियानाच्या बॉलिवूड पदार्पणाबद्दल भाष्य केले आहे. एका मुलाखतीत महिमा चौधरी म्हणाली की, मला चित्रपट आवडतात. मला क्रिएटिविटी आवडते आणि ती माझ्या इतिहासाचा एक भाग व्हावी, अशी माझी इच्छा आहे. सध्या लवकरच नाही, पण ती बॉलिवूडमध्ये येईल. मी जो आयुष्यात सेटअप केला आहे. तो येथेच केला आहे. मुंबईपेक्षा चांगले काहीही नाही. म्हणून मला वाटते की तिने इथेच राहावे. महिमा चौधरीने अनेक चित्रपटांमध्ये काम केले आहे. अभिनेता शाहरुख खानसोबतच्या 'परदेस' या चित्रपटामुळे तिला मोठी लोकप्रियता मिळाली. अलीकडेच महिमा 'दुर्लभ प्रसाद की दूसरी शादी' या चित्रपटात संजय मिश्रा यांच्यासोबत झळकली. यापूर्वी ती 'नादानियां' चित्रपटात दिसली होती.

# महिमा चौधरीचा लेकीचे बॉलीवूड पदार्पण





# मलायकाला लवकर लग्न केल्याचा पश्चाताप

मलायका अरोराने नुकतच तिच्या घटस्फोटाबद्दल मनमोकळेपणाने भाष्य केलं आहे. अरबाज खानसोबतच्या घटस्फोटानंतर तिला प्रचंड टीका आणि विरोध सहन करावा लागला, असं तिनं सांगितलं. हा विरोध फक्त समाजाकडूनच नव्हे, तर मित्र-मैत्रिणी आणि कुटुंबाकडूनही झाला, असं ती म्हणाली. मलायका आणि अरबाज यांनी २०१६ मध्ये वेगळं होण्याचा निर्णय घेतला आणि २०१७ मध्ये घटस्फोट झाला.

एका मुलाखतीत मलायकाने सांगितलं की, त्या काळात तिच्या प्रत्येक निर्णयावर प्रश्न विचारले जात होते. तरीही तिनं स्वतःच्या आनंदाला प्राधान्य दिलं आणि निर्णयावर ठाम राहिली. मला पुढे काय होणार आहे हे माहीत नव्हतं, पण त्या क्षणी बदल करणं माझ्यासाठी गरजेचं होतं, असं ती म्हणाली. मलायकाच्या मते, स्त्रियांना स्वतःचा आनंद निवडल्यावर जास्त प्रश्न विचारले जातात, पण पुरुषांना तसे प्रश्न सहसा विचारले जात नाहीत. हे पितृसत्ताक समाजाचं वास्तव असल्याचं तिनं सांगितलं. लग्नाबद्दल बोलताना मलायका म्हणाली की, तिला लग्न या संकल्पनेवर विश्वास आहे; पण ते प्रत्येकासाठीच योग्य असेल, असं नाही. लग्न किंवा प्रेम जबरदस्तीने शोधण्यापेक्षा ते नैसर्गिकपणे घडावं, असं तिला वाटतं. तरुणांना सल्ला देताना मलायकाने स्पष्टपणे सांगितलं की, लहान वयात लग्न करू नये. लग्नाआधी आयुष्य अनुभवणं, आर्थिक आणि भावनिकदृष्ट्या स्वावलंबी होणं महत्त्वाचं आहे. लवकर लग्न केल्याचा तिला पश्चाताप असल्याचंही तिनं मान्य केलं.

# 'धुरंधर'साठी रणवीरनं घटवलं १५ किलो वजन


बॉलिवूडच साधारणपणे एखादा चित्रपट बॉक्स ऑफिसवर हिट ठरला की, त्यातील कलाकार लगेचच लोकांचे आवडते बनतात. सोशल मीडियावर त्यांच्या फोटो-व्हिडिओंचा जणू पूर येतो, सतत सार्वजनिक कार्यक्रमांना हजेरी लावणे आणि एकामागोमाग एक मुलाखती सुरू होतात. मात्र, 'धुरंधर'च्या यशानंतरही रणवीर सिंहने वेगळा मार्ग निवडला आहे. रणवीर सध्या चर्चेपासून दूर आहे. आनंद व्यक्त करणाऱ्या पोस्ट नाहीत. २०१९ मध्ये आलेल्या 'गली बॉय' या चित्रपटानंतर रणवीर सिंहला बराच काळ बॉक्स ऑफिसवर असं यश मिळाले नव्हतं. '८३' या चित्रपटाला समीक्षकांकडून चांगली दाद मिळाली; मात्र कोविडमुळे तो व्यावसायिकदृष्ट्या अपयशी ठरला. 'जयेशभाई जोरदार' आणि 'सर्कस' या चित्रपटांनाही खास प्रतिसाद मिळाला नाही. या काळात करण जोहर दिग्दर्शित 'रॉकी और रानी की प्रेम कहानी' याच एकमेव चित्रपटाला समीक्षकांची पसंती मिळाली आणि बॉक्स ऑफिसवरही यश मिळालं. 'धुरंधर'च्या प्रदर्शनानंतर रणवीर सिंहनं एकदाच इन्स्टाग्रामवर स्टोरी पोस्ट करीत, नशिबाची एक खूप सुंदर सवय असते. योग्य वेळ आली की, ते नक्कीच बदलतं; पण तोपर्यंत आशा आणि संयम ठेवा, असं म्हटलं होतं. अशातच आता पापाराझी फोटोग्राफर वीरेंद्र चावला यांनी रणवीर सिह त्यांना भेटल्यानंतर 'धुरंधर'बद्दल तो काय म्हणाला याबद्दल सांगितलं आहे. रणवीरबद्दल वीरेंद्र चावला म्हणाले, जेव्हा पीआरनं आमची भेट घडवून दिली तेव्हा त्यानं मला एक गोष्ट सांगितली की, पाजी मी खूप मेहनत केली आहे यासाठी. वीरेंद्र रणवीरबद्दल पुढे म्हणाले, रणवीरनं मला सांगितलं की, त्यानं या भूमिकेसाठी १५ किलो वजन घटवलं आणि खरं सागायचं तर, जेव्हा मी थिएटरमधून बाहेर पडलो तेव्हा मला त्यानं किती मेहनत घेतली याची जाणीव झाली. मी त्याला मेसेज करून सांगितलं की, मला चित्रपट खूप आवडला आणि तेव्हासुद्धा त्याचा असाच रिपलाय होता की, मी खूप मेहनत घेतली आहे. केवळ अली अब्बास जफरच नाही, तर अहान संजय लीला भन्साळी यांच्यासोबतही चित्रपट करेल, अशी शक्यता आहे. नुकताच अहान भन्साळी यांच्या कार्यालयातून बाहेर पडताना दिसला. त्यामुळे, अहान हा भन्साळींच्या पुढील चित्रपटाचा हिरो असू शकतो, असा अंदाज लावला जात आहे. मात्र या संदर्भात भन्साळी किंवा अहान या दोघांकडूनही कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही.






# सूर्याच्या चित्रपटात रवीनाची एन्ट्री

बॉलिवूड अभिनेत्री रवीना टंडन हिने तिच्या चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी आली आहे. रवीनाला तमिळ सुपरस्टार सूर्याच्या आगामी सूर्य ४६ चित्रपटात कास्ट करण्यात आले आहे. निर्मात्यांनी ही बातमी अधिकृतपणे जाहीर केली आहे आणि रवीनाचे स्वागत केले आहे आणि तिला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. चित्रपटाच्या निर्मात्यांनी सोशल मीडियावर रवीनाला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आणि तिचे चित्रपटात स्वागत केले. निर्मात्यांनी रवीनाचा एक फोटो आणि वाढदिवसाच्या शुभेच्छा असे लिहिलेले पोस्टर शेअर केले. कॅप्शनमध्ये लिहिले आहे, 'सूर्य ४६' टीम सदाबहार रवीना टंडनला वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा देते. तुम्हाला सोबत घेऊन आम्हाला खूप आनंद झाला आहे आणि पुढील अद्भुत प्रवासाची आम्ही आतुरतेने वाट पाहत आहोत. जूनच्या सुरुवातीला, प्रॉडक्शन हाऊसने शूटिंग सुरू झाल्याचे औपचारिक रूपात सूर्याचा एक पोस्टर शेअर केला होता. कॅप्शनमध्ये लिहिले होते, सेलिब्रेशन, भावना आणि मनोरंजनाकडे पहिले पाऊल. 'सूर्य ४६' चे शूटिंग सुरू होते. तेव्हापासून चाहते चित्रपटासाठी उत्सुक आहेत. नागा वामसी निर्मित, सितारा एंटरटेनमेंट अंतर्गत, वेंकी अटलूरी दिग्दर्शित हा चित्रपट सध्या 'सूर्य ४६' असे नाव देण्यात येत आहे. यात राधिका सारथकुमार आणि ममिता बैजू देखील आहेत. आता, रवीना टंडनच्या चित्रपटात प्रवेशामुळे, बॉलिवूड चाहते देखील चित्रपटासाठी उत्सुक आहेत.



# नयनताराचा 'टॉक्सिक' अवतार

दाक्षिणात्य सुपरस्टार यशच्या 'टॉक्सिक' चित्रपटाची प्रेक्षक उत्सुकतेने वाट पाहत आहेत. बॉलिवूड अभिनेत्री कियारा अडवाणी आणि हुमा कुरैशी या 'टॉक्सिक'मध्ये झळकणार आहेत. त्यांचे पोस्टरही समोर आले आहेत. आता कियारा आणि हुमानंतर 'लेडी सुपरस्टार' नयनताराचा फर्स्ट लूक समोर आला आहे. नयनताराचा हा लूक सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. निर्मात्यांनी एकापाठोपाठ एक सरप्राईज देत चाहत्यांची उत्सुकता वाढवली आहे. नयनताराचा चित्रपटातील पहिला लूक शेअर करण्यात आला. नयनतारा 'टॉक्सिक' मध्ये 'गंगा'ची भूमिका साकारणार आहे. पोस्टरमध्ये तुम्ही पाहू शकता की, एका काळ्या रंगाच्या स्टायलिश हाय-स्लिट गाऊनमध्ये चालत येताना दिसतेय. तिच्या हातात बंदूक आणि डोळ्यात अंगार आहे. तिचा हा किलर लूक पाहून चाहते चित्रपटासाठी अधिक उत्सुक झाले आहेत. नयनताराच्या लूक पोस्टला खूप कॅप्शन देण्यात आले आहे. लिहिलं की, 'अ टॉक्सिक फेयरी टेल फॉर ग्रोन-अप्स'मध्ये 'गंगा'च्या भूमिकेत नयनताराला सादर करत आहोत. तिच्या या पोस्टवर चाहते भरभरून कमेंट्स करत आहे. 'टॉक्सिक'मधील केवळ नयनताराच नाही, तर इतर अभिनेत्रींचे लूकही चर्चेत आहेत. कियारा अडवाणी 'नादिया'च्या भूमिकेत दिसणार आहे. तर हुमा या चित्रपटात 'एलिझाबेथ'ची भूमिका साकारत आहे. तसेच या चित्रपटात तारा सुतारियादेखील झळकणार असल्याची चर्चा आहे. पण, अद्याप अधिकृत घोषणा झालेली नाही. 'टॉक्सिक' च्या प्रदर्शनाची तारीख १९ मार्च २०२६ आहे. हा चित्रपट इंग्रजी आणि कन्नडमध्ये एकाच वेळी चित्रित होतोय. तर हिंदी, तेलुगू, तमिळ आणि मल्याळम भाषांमध्ये डब केला जाणार आहे. हा ड्रग माफियांच्या पार्श्वभूमीवर आधारित चित्रपट आहे.



# रश्मिका आणि विजयच्या लग्नाचा मुहूर्त ठरला!

अभिनेत्री रश्मिका मंदाना आणि अभिनेता विजय देवरकोंडा यांच्या लग्नाच्या चर्चा मागील काही दिवसांपासून सुरू आहे. अखेर हे जोडपं आता २०२६ च्या नव्या वर्षात आपली लग्नगाठ बांधणार असल्याचं बोललं जात आहे. रश्मिका आणि विजयच्या लग्नाची तारीख आणि ठिकाण ठरले असल्याची माहिती समोर आली आहे. एका वृत्तानुसार, रश्मिका आणि विजय २६ फेब्रुवारी २०२६ रोजी राजस्थानमधील उदयपूरच्या एका राजवाड्यात लग्न करणार आहेत. त्यांनी एक ऐतिहासिक महाल निश्चित केला आहे. साखरपुड्याप्रमाणेच, दोघेही लग्नही एका खाजगी सोहळ्यात करणार आहेत. फक्त त्यांचे नातेवाईक आणि जवळचे मित्र या सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत. रश्मिका आणि विजय यांनी दसऱ्याच्या एक दिवसानंतर ३ ऑक्टोबर २०२५ रोजी हैदराबादमध्ये साखरपुडा केला होता. जरी या कपलने स्वतः सोशल मीडियावर कोणतीही घोषणा केली नसली तरी, विजयच्या टीमने नंतर साखरपुड्याची पुष्टी केली आणि फेब्रुवारीमध्ये लग्न करण्याचे संकेत दिले. यातच आता हे जोडपं फेब्रुवारीमध्ये लग्न करणार असल्याची माहिती मिळत आहे. रश्मिका आणि विजयच्या प्रेमकथेची सुरुवात 'गीता गोविंदम' या चित्रपटाने झाली. रश्मिका आणि विजयची केमिस्ट्री पहिल्यांदा २०१८ च्या सुपरहिट चित्रपट 'गीता गोविंदम' मध्ये दिसली. २०१९ च्या 'डियर कॉम्रेड' या चित्रपटाने त्यांची ऑन-स्क्रीन जोडी प्रेक्षकांना आणखी आवडली. त्यांच्या चित्रपटांव्यतिरिक्त ते अनेक कार्यक्रमांमध्ये एकत्र दिसले आहेत. अनेकदा ते एकत्र व्हेकेशन एन्जॉय करतात, मात्र एकत्र कधीही पोस्ट शेअर करत नाहीत.



# लग्नानंतर नवऱ्याने काम करु दिलं नाही तर...?

'सैराट' सिनेमामुळे रातोरात स्टार झालेली मराठी अभिनेत्री रिंकू राजगुरु सध्या चर्चेत आहे. नुकताच तिचा 'आशा' सिनेमा रिलीज झाला ज्याला गावागावात खूप प्रतिसाद मिळत आहे. रिंकुने आशा वर्करचं काम उत्तमरित्या केलं आहे. रिंकूला खूप कमी वयात यश मिळालं. सैराट आला तेव्हा ती फक्त १० वीत होती. नंतर तिने ३ वर्ष कामच केलं नाही. आता ती पुन्हा मराठी सिनेमांमध्ये वेगवेगळ्या भूमिका साकारताना दिसते. वैयक्तिक आयुष्याबद्दल रिंकूने नुकताच खुलासा केला. तिला गावी राहणारा मुलगा हवा की शहरी मुलगा हवा? लग्नानंतर मुलाने काम करु दिलं नाही तर? यावर रिंकूने उत्तर दिलं आहे. रिंकू राजगुरु मूळची अकलुजची आहे. तिचं कुटुंब तिथेच राहतं. तर रिंकू कामासाठी मुंबईत राहते. मात्र ती वेळ मिळाला की लगेच गावी जाते. 'आरपार'ला दिलेल्या मुलाखतीत रिंकूला लग्न, मुलगा कसा हवा, त्याने लग्नानंतर काम करुन दिलं नाही तर? असे प्रश्न विचारण्यात आले. तेव्हा ती म्हणाली, मी शहरात किंवा गावात रमणारी अशी मुलगी नाही तर मी चांगली माणसं असतील तर कुठेही राहायला तयार असते. माझे आईवडील आज इथे राहत असते तर मी मुंबईत कायमस्वरुपी राहिले असते. माझं शहर-गाव असं नाही जिथे माझी माणसं भेटतील तिथे मी राहते आणि रमते. मुलगा चांगला असेल तर तो कुठेही राहत का असेना मला फकत पडत नाही. लग्नानंतर काम करायला परवानगी दिली नाही तर? यावर रिंकू म्हणाली, ते मी लग्नाआधीच स्पष्ट करुन घेईन. कारण कामाने मला ओळख दिली आहे. ज्या गोष्टी करताना आईवडीलांनीही कधी हात पकडला नाही तिथे दुसर्यानेही पकडू नये. मला ते स्वातंत्र्य हवं आहे. मी काहीही चुकीचं आणि वेगळं करते. तसं करत असेल तर मला आवर्जुन येऊन सांगा की हे तू चुकीचं करतीये. मग कोणीही असेल तरी मी ऐकते. पण कामापासून कधी थांबवू नये. इतकी वर्ष जितकं आपण कामाबरोबर जगतो ते कोणीतरी महिनाभरापूर्वी आयुष्यात आलेला माणूस जर हिसकावून घेत असेल तर त्यापेक्षा वाईट काहीच नाही. मग तो माणूसच नको. मला वाटतं प्रेम करताना पुढचा ज्याच्यावर प्रेम करतोय त्यावर आपलंही प्रेम असतं आणि आपण त्यासकट त्याला स्वीकारतो. त्यामुळे मग आपण काम करताना आवडत नाही. तुला आवडतंय ना? तू कर...असं असलं पाहिजे. जर कोणी थांबवत असेल तर मग त्याला इर्ष्या म्हणतात. त्यापेक्षा लग्नच नको. आपण कामाशी लग्न करु आणि काम करु.

# फिटनेस अन् माझा ३६ चा आकडा



प्रसिद्ध अभिनेत्री रेणुका शहाणेंच्या सुंदर हास्याचे लाखो चाहते आहेत. आजवर त्यांनी 'सुरभि', 'हम आपके है कौन' अशा गाजलेल्या कलाकृतींच्या माध्यमातून आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला आहे. त्यांच्या निखळ हास्याने लाखो चाहत्यांची मनं जिंकून घेतली आहे. रेणुका शहाणेंनी नुकतीच 'उत्तर' सिनेमाच्या निमित्ताने संवाद साधला यावेळी त्यांना सुंदर हास्यामागचं गुपित आणि फिटनेसबद्दल विचारण्यात आलं. फिटनेसचा प्रश्न ऐकताच अभिनेत्री काहीशा लाजल्या. कारण, फिटनेस अन् त्यांचा ३६ चा आकडा असल्याचं त्यांनी सांगितलं. रेणुका शहाणे म्हणाल्या, मी माझ्या धाकट्या मुलाला सांगत होते हे सगळं 'उत्तर' सिनेमाचं प्रमोशन झाल्यावर मला जरा फिटनेसकडे लक्ष दिलं पाहिजे. मी तर हल्ली चालायला जाणं सुद्धा बंद केलंयखरंच सांगते मला वेळ मिळत नाही. घरची इतकी कामं असतात, त्यानंतर बाहेरची कामंही सुरू असतात. डोक्यात सतत कामाचा विचार सुरू असतो. आज धाकट्या मुलाचं हे आहे, मोठ्या मुलाचं ते काम आहेमोठा मुलगा म्हणजे आमचे राणाजी. या सगळ्यामुळे खरंच फिटनेस वगैरेकडे मी फार लक्ष देत नाही. मानसिकदृष्ट्या फिट असणं याकडे माझं जास्त लक्ष असतं. माझा स्वभाव खूपच समाधानी आहे आणि याचं श्रेय मी आई-बाबांना आणि निसर्गाला देईन. इतकी वर्ष हे जे माझं स्माइल सर्वांना दिसतंय आणि आवडतंय याचं कारण मी मानसिकदृष्ट्या फिट आणि समाधानी आहे. याशिवाय मला कामाच्या ठिकाणी सुद्धा नेहमी छान माणसं भेटली. छोट्या-छोट्या गोष्टींमध्ये मला आनंद मिळतो म्हणूनच मी खूश असते. असं रेणुका शहाणेंनी सांगितलं. फिटनेस आणि माझा ३६ चा आकडा आहे. शारीरिक व्यायाम हा प्रकार मला अजिबातच आवडत नाही. पोट कमी कसं करायचं हा माझ्या आयुष्यातील सर्वात मोठा प्रश्न आहे. जेव्हापासून मुलं झाली तेव्हापासून हा प्रश्न कायम आहे. आता तर माझी मुलं म्हणतात, आई कशाला कमी करायचंय पोट ते आमचं प्रथमं गृहम् आहे. असं रेणुका शहाणेंनी सांगितलं.

# सलमानबरोबर पुन्हा काम करणार नाही



मराठीसह हिंदी सिनेसृष्टीत आपल्या अभिनय आणि दिग्दर्शनानं प्रेक्षकांचं मनोरंजन करणारे लोकप्रिय दिग्दर्शक व अभिनेते म्हणजे महेश मांजरेकर. ते त्यांचा स्पष्टवक्तेपणा आणि बेधडक स्वभाव यांमुळे कायमच चर्चेत असतात. इतकंच नव्हे, तर त्यांच्या मैत्रीचेसुद्धा अनेक किस्से आहेत. बॉलीवूडचा दबंग अभिनेता सलमान खानही त्यांचा खास मित्र आहे. सलमान खान आणि महेश मांजरेकरांनी अनेक सिनेमांत एकत्र काम केलं आहे. मात्र, नुकत्याच एका मुलाखतीत महेश मांजरेकरांनी मित्र सलमान खानसह एकत्र काम करणार नसल्याचं म्हटलं आहे. 'अंतिम' सिनेमातही दोघांनी एकत्र काम केलं होतं. या सिनेमाचं दिग्दर्शन महेश मांजरेकरांनी केलं होतं आणि सलमान खान त्यात मुख्य भूमिकेत होता. मराठीतल्या 'मुळशी पॅटर्न'चा तो रिमेक होता. महेश मांजरेकर सध्या त्यांच्या आगामी 'पुन्हा शिवाजीराजे भोसले' या चित्रपटामुळे चर्चेत आहेत. या चित्रपटाच्या निमित्तानं त्यांनी माझा कट्टाशी साधलेल्या संवादात सलमान खानसह पुन्हा काम करणार नसल्याचं सांगितलं. त्याबद्दल महेश मांजरेकर म्हणाले, मला आठवतंय की, कॅन्सरनंतर माझा वाढदिवस होता. नुकतंच ऑपरेशन झालं होतं. मला बाहेर कुठे जाणं शक्य नव्हतं. तेव्हा 'इंडियन आयडॉल'चे फायनलिस्ट घरी आले होते. त्यांनी सगळ्यांनी गाणी वगैरे म्हटली. एन्जॉय केलं आणि रात्री ३ वाजता सलमान घरी आला आणि म्हणाला, 'मला का नाही बोलावलं?'. त्याच्यावर मी चिडलो होतो. तो मला म्हणाला, 'तू मला शिवी दिलीस'. तर मी त्याला म्हणालेलो की 'सलमान, मी तुला नाही तुझ्यामधल्या दिग्दर्शकाला बोलतोय'. त्यानंतर महेश मांजरेकर सांगतात, सलमानबरोबर मी 'अंतिम' सिनेमा केला; पण आता त्याच्याबरोबर पुन्हा दुसरा सिनेमा करणार का? असं विचारलं; तर माझं उत्तर असेल 'नाही'. सलमानला वाटतं की, त्याला सिनेमा कळतो. कारण- त्याचे वडील सिनेमा निर्माते आहेत. त्यामुळे त्याच्यातसुद्धा एक दिग्दर्शक लपला आहे. माझं म्हणणं होतं की, तू मला दिग्दर्शक म्हणून सिनेमा दिलास ना? मग बाकीच्या गोष्टी विसर. पुढे महेश मांजरेकरांनी त्याचं कौतुक करत म्हटलं, सलमान माणूस म्हणून खूप चांगला आहे. तो कोणत्याच गोष्टीसाठी मला नाही म्हणत नाही. एखाद्या कार्यक्रमाला वगैरे मी त्याला बोलावलं की, तो मला कधीच नाही म्हणत नाही. मदत करायला तो कायम तत्पर असतो. दरम्यान, २०२१ मध्ये सलमान आणि महेश मांजरेकरांचा 'अंतिम : द फायनल ट्रुथ' हा सिनेमा आला होता. सलमानच्या या सिनेमाला बॉक्स ऑफिसवर विशेष असा प्रतिसाद मिळाला नव्हता.

# नव्या वर्षात प्रदर्शित होणार 'हे' कॉमेडी चित्रपट

**नवीन वर्ष लवकरच सुरू होणार असताना नवीन वर्षात कोणते चित्रपट प्रदर्शित होणार याची रसिक प्रेक्षकांमध्ये नेहमी उत्सुकता असते. २०२५ मध्ये 'छावा', 'सैयारा' ते आता बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत असलेला 'धुरंधर' असे अनेक चित्रपट प्रदर्शित झाले. ॲक्शन, थ्रिलर, रोमँटिक आणि कॉमेडी अशा विविध जॉनरचे चित्रपट प्रदर्शित झाले. कॉमेडी चित्रपटांचा वेगळा प्रेक्षकवर्ग असतो. अक्षय कुमार, परेश रावल यांसारखे अनेक कलाकार आहेत, ज्यांचा यामध्ये हातखंडा आहे. २०२५ मध्ये 'हाऊसफुल५', 'सनी संस्कारी की तुलसी कुमारी', 'सन ऑफ सरदार २' यांसारखे अनेक कॉमेडी चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आले, त्यामुळे आता २०२६ मध्ये कोणते चित्रपट प्रदर्शित होणार जाणून घेऊया...**




अभिनेता अक्षय कुमार ते रितेश देशमुख या कलाकारांचे चित्रपट नवीन वर्षात प्रदर्शित होणार आहेत.

२०२६ मध्ये प्रदर्शित होणाऱ्या काही चित्रपटांच्या तारखा जाहीर झाल्या आहेत, तर काहींच्या होणार आहेत. २०२६ मध्ये प्रदर्शित होणाऱ्या कॉमेडी चित्रपटांच्या यादीतलं पहिलं नाव आहे 'हेरा फेरी ३.' परेश रावल, अक्षय कुमार आणि सुनील शेट्टी यांचा हा चित्रपट नवीन वर्षात प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. अद्याप सिनेमाची तारीख जाहीर झाली नसून माध्यमांच्या वृत्तानुसार नवीन वर्षात मॉन्सूनमध्ये हा चित्रपट प्रदर्शित होणार असल्याचं म्हटलं जात आहे.

२०२६ मध्ये अक्षय कुमारचा अजून एक कॉमेडी चित्रपट प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाचं दिग्दर्शनसुद्धा प्रियदर्शन यांनी केलं आहे. या चित्रपटाचं नाव आहे 'भूत बंगला.' अक्षय कुमारसह या चित्रपटात परेश रावल, तब्बू, वामिका गब्बी हे कलाकार महत्त्वपूर्ण भूमिकेमध्ये झळकणार आहेत. 'भूत बंगला' हा चित्रपट २ एप्रिल २०२६ मध्ये प्रदर्शित होणार आहे.




२०२६ मध्ये मराठमोळ्या मृणाल ठाकूरचा 'हैं जवानी तो इश्क होना हैं' हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. डेविड धवन दिग्दर्शित या चित्रपटात मृणालसह वरूण धवन व पूजा हेगडेसुद्धा झळकणार आहे. ५ जून २०२६ रोजी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे.








अजय देवगणचा 'धमाल ४' हा चित्रपटसुद्धा नवीन वर्षात प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'धमाल ४'मध्ये अजय देवगण, रितेश देशमुख, अर्शद वारसी आणि जावेद जाफरी यांसारखे कलाकार महत्त्वपूर्ण भूमिका साकारणार आहेत. माध्यमांच्या वृत्तानुसार नवीन वर्षात हा चित्रपट मे महिन्यात प्रदर्शित होणार आहे.

२०२६ मध्ये आयुष्मान खुराना व सारा आली खान यांचा 'पती पत्नी और वो २' हा चित्रपटही प्रदर्शित होणार आहे. 'पती पत्नी और वो' या चित्रपटाचा हा सिक्वल आहे. ४ मार्च २०२६ मध्ये हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे.

# प्रभास-तृप्तीचं चाहत्यांना खास सरप्राईज




टॉलिवूड ते बॉलिवूडपर्यंत प्रवास करत यशस्वी झालेल्या कलाकारांमध्ये अभिनेता प्रभासचं नाव आवर्जुन घेतलं जातं. बाहुबली- द बिगिनिंग आणि बाहुबली- द कनक्ल्यूजन यांसारख्या चित्रपटांमुळे लोकप्रियतेचे शिखर गाठणाऱ्या या अभिनेत्याचा संपूर्ण भारतात मोठे चाहते आहेत. त्याच्या प्रत्येक सिनेमाची प्रेक्षक मोठ्या आतुरतेने वाट बघत असतात. अखेर सिनेरसिकांची प्रतीक्षा संपली आहे.लवकरच प्रभास स्पिरिट या त्याच्या आगामी चित्रपटातून चाहत्यांच्या भेटीला येणार आहे. नुकतंच या चित्रपटाचं पहिलं पोस्टर समोर आलं आहे. नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच आपल्या चित्रपटाचं पोस्टर शेअर करत प्रभास-तृप्ती डिमरीने चाहत्यांना अनोखं सरप्राइज दिलं आहे. गेल्या वर्षभरापासून संदीप रेड्डी वांगा यांचा स्पिरिट या चित्रपटाची जोरदार चर्चा सुरु होती. अभिनेत्री दीपिका पादुकोणची चित्रपटातून एक्झिट झाल्यानंतर वातावरण चांगलंच तापलं होतं. त्याची अनेक कारणेही समोर आली होती. दीपिकाच्या एक्झिटनंतर सिनेमात प्रभास सोबत तृप्ती डिमरीची जोडी जमली आहे. २०२६ या नवीन वर्षाची धमाकेदार सुरुवात करत, संदीप वांगा यांनी त्यांच्या आगामी 'स्पिरिट' चित्रपटाची पहिली झलक शेअर केली आहे, ज्यामध्ये प्रभास आणि तृप्ती डिमरी यांचा जबरदस्त लूक पाहायला मिळतोय. त्यामुळे चाहत्यांच्या आनंद गगनात मावेनासा झाला आहे. संदीप रेड्डी वांगा यांच्या आधीच्या ब्लॉकबस्टर 'निमल' प्रमाणेच 'स्पिरिट' या चित्रपटाचं पहिलं पोस्टर नवीन वर्षाच्या दिवशी म्हणजेच १ जानेवारी २०२६ रोजी मध्यरात्री प्रदर्शित करण्यात आलं आहे. या पोस्टरमुळे चाहते अधिकच उत्सुक झाले आहेत.'स्पिरिट' मध्ये प्रभास लांब केस आणि दाढी- मिशी असलेला त्याचा लूक आहे. या लूकवरून अभिनेत्याच्या पात्राबद्दल अंदाज येतो आहे. शिवाय पोस्टरमध्ये अभिनेत्याच्या एका हातात दारूचा ग्लास आहे, तर दुसरा हात त्याच्या कमरेवर आहे. त्याचा हा लूक सर्वांना आवडला आहे.दुसरीकडे, तृप्ती डिमरीने तिच्या दमदार लूकने चाहत्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे.यावरून स्पिरिट सिनेमा जबरदस्त एंटरटेन्मेंटचं पॅकेज असणार एवढं मात्र, नक्की...

# 'धुरंधर २' मध्ये पुन्हा दिसणार रहमान डकैत?

दिग्दर्शक आदित्य धर यांचा 'धुरंधर' हा चित्रपट सध्या बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करत आहे. या चित्रपटातील रणवीर सिंगच्या अभिनयाचं कौतुक होत असलं तरी, खलनायक 'रेहमान डकैत' साकारणाऱ्या अक्षय खन्नाने आपल्या अभिनयाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. आता सोशल मीडियावर चाहत्यांनी एक नवीन शोध लावला आहे. ज्यामुळे 'धुरंधर २' मध्ये अक्षय खन्नाची पुन्हा एन्ट्री होणार असल्याची जोरदार चर्चा रंगली आहे. 'धुरंधर' चित्रपटाच्या पहिल्या भागाच्या शेवटी रेहमान डकैतचा मृत्यू झाल्याचे दाखवण्यात आले होते, त्यामुळे दुसऱ्या भागात अक्षय खन्ना दिसणार नाही हे स्पष्ट होतं. मात्र, नेटकऱ्यांनी अक्षय खन्नाचे विकिपीडिया पेज तपासले असून तिथे एक खास गोष्ट आढळून आली. ती म्हणजे, अक्षयच्या आगामी चित्रपटांच्या यादीत 'धुरंधर पार्ट २'चा उल्लेख दिसला आहे. याशिवाय 'धुरंधर पार्ट २' हा चित्रपट सध्या 'पोस्ट-प्रोडक्शन' टप्प्यात असल्याचेही तिथे नमूद करण्यात आले आहे. या एका माहितीमुळे चाहत्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

अक्षय खन्नाची 'धुरंधर २' मध्ये एन्ट्री कशी होऊ शकते, यावर चाहत्यांनी अनेक तर्कवितर्क लावले आहेत. काहींच्या मते, चित्रपटात रेहमान डकैतच्या भूतकाळातील काही महत्वाच्या घटना फ्लॅशबॅकच्या माध्यमातून दाखवल्या जाऊ शकतात, तर काहींना वाटते की रणवीर सिंगच्या पात्राला रेहमान डकैतचा भास होत असल्याचे दाखवले जाईल. एका युजरने असाही दावा केला आहे की, ट्रेलरमध्ये अक्षय खन्नाचे असे काही सीन्स आहेत जे पहिल्या भागात दाखवण्यात आलेले नाहीत, त्यामुळे ते दुसर्या भागात समाविष्ट असू शकतात. २०२५ मधील सर्वात यशस्वी चित्रपटांपैकी एक असलेल्या 'धुरंधर'ने आतापर्यंत भारतात ७२२ कोटींहून अधिक आणि जगभरात ११०० कोटींहून अधिक कमाई केली आहे. अक्षय खन्नाचा या चित्रपटातील 'शेर-ए-बलोच' लूक आणि त्याचा डान्स प्रचंड व्हायरल झाला आहे. त्यामुळे 'रेहमान डकैत' या पात्राची लोकप्रियता पाहता, निर्माते अक्षयला दुसर्या भागात कोणत्या ना कोणत्या स्वरूपात नक्कीच समोर आणतील अशी चाहत्यांना खात्री आहे. 'धुरंधर २' हा चित्रपट १९ मार्च २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे.

**१९५० ते १९७० हा चित्रपटाचा सुवर्णकाळ आठवा. राजेंद्रकुमार यांनी अभिनयात धुवाधार फलंदाजी करीत ८० डावात (चित्रपटात) २५ च्या वर शतके (सुवर्ण व रजत जयंती) ठोकलीत; जे कीर्तिमान बराच काळ टिकले. स्मरण रंजनाच्या धूसर व घसरत्या आठवणी आजही मनात गर्दी करतात. व राजेंद्र कुमार आठवतात. 'घुंघट नही खोलूंगी सैया तोरे आगे...' १९५७ सालच्या 'मदर इंडिया' या चित्रपटसृष्टीतील माईल स्टोन चित्रपटात महत्त्वाची भूमिका मिळविणे व त्यातही अनेक दिग्गज कलाकारांच्या साथीत आपली स्वतःची वेगळी अभिनय प्रतिमा उभी करणे हे राजेंद्र कुमारच करू शकले.**




'गुंज उठी शहनाई' या १९५९ सालच्या चित्रपटात दिग्गज बिस्मिल्ला खान यांच्या शहनाईच्या सुरावर राजेंद्र यांनी शहनाई वादकाच्या भूमिकेत हातांच्या बोटांची कलागत हुबेहूब सादर करुन शहनाई वादक प्रत्यक्ष सादर केला. 'कोहिनुर' चित्रपटात 'मधुबन मे राधिका' या गाण्यासाठी दिलीपकुमार यांनी सहा महिने सतारीवर मेहनत केली होती, अशी माहिती आहे. राजेंद्र यांनीही शहनाईवर अशीच मेहनत पिसली असेल. हा तुलनेचा विषय नाही. शहनाईच्या सुरावर राजेंद्र व अमिता यांचे प्रेम खुलताना अतिशय मोहक चित्रीकरणात सादर केले आहे. संगीतकार वसंत देसाई यांनी हे गाणे शहनाईच्या साथीत अतिशय सुरेल बांधून अमर केले. 'बिखर गये बचपनके सपने अरमानोकी शाम ढले' वरील चित्रपट दुःखद अंताचा आहे. राजेंद्र कुमार हे बहुआयामी असूनही ट्रॅजेडी साकार करण्याची त्यांची तर्हा मन हेलावून टाकणारी असायची. राजेंद्रकुमार यांच्यावर दिलीपकुमार यांचा डुप्लिकेट म्हणून ठप्पा बसला होता. दोघांचेही ट्रेंड व वैशिष्ट्य दुःखी प्रसंगात स्वतंत्र परिणाम साधायचे. राजेंद्र कुमार डुप्लिकेट होते, हे १०० टक्के खरे असते तर डुप्लिकेटचे २५ च्या वर ओरिजिनलपेक्षा जास्त चित्रपट रजत व सुवर्ण महोत्सवी ठरले नसते. त्याला ज्युबिली कुमार अशी ओळख मिळाली नसती.

दिलीपकुमार महान कलाकार होते, यात शंकाच नाही. दिलीपकुमार टेन्शन बाळगून दुःखी अभिनयात वाकबगार तर राजेंद्रकुमारचा तणावातला अभिनय त्याचा स्वतःचा होता. दिल एक मंदिर, गुंज उठी शहनाई, संगम इ. दुःखद अंत असलेले चित्रपट त्यांनी यशस्वी केलेत. सैगल युग संपल्यावर नवीन युगाचे शिलेदार दिलीप, राज कपूर व देवानंद होते. हे त्रिदेव १५-२० वर्षे चित्रपटसृष्टीतील शहेनशहा होते. या तिघांच्या झंझावातात आपली स्वतंत्र ओळख राजेंद्र यांनी निर्माण केली. खरे तर या तिघांचे युग व पुढील धर्मेंद्र- जितेंद्र युगातील दुवा म्हणजे राजेंद्रकुमार होते. बदलत्या युगातील सांधा राजेंद्र यांनी कौशल्याने जोडला. नवीन युग केव्हा सुरू झाले समजले नाही.

'रंग दिलकी धडकन भी लाती तो होती याद मेरी उनको भी आती तो होती' १९६० सालच्या 'पतंग' चित्रपटात माला सिन्हा या देखण्या नटीबरोबर राजेंद्रकुमार यांनी अभिनयात लज्जत भरली. १९६१ सालच्या 'ससुराल' चित्रपटातील हे लोकप्रिय प्रेम गीत. मोहम्मद रफी यांची 'चम्मेबद्दूर' उच्चारण्याची लकब व पडद्यावर बी. सरोजादेवी व राजेंद्रकुमार या प्रेमीयुगलाने अल्लड व गोड अभिनयाने पडद्यावर भरलेली रंगत, या मिश्रणामुळे या गाण्याने व प्रसंगाने कीर्तिमान स्थापित केला होता. १९६४ सालच्या 'संगम' चित्रपटातील हे प्रसिद्ध गाणे. राज कपूर, वैजयंतीमाला व राजेंद्र यांच्यावर चित्रित झाले आहे. प्रेमाचा त्रिकोण या गाण्यात जुळला आहे. हा चित्रपट १९४९ च्या 'अंदाज' चित्रपटाचा रिमेक होता. गोपालच्या भूमिकेसाठी राज कपूर यांनी राजेंद्रची निवड केली. 'सबने अपनी अपनी कह दी लेकिन हम चुपचाप रहे' या दीर्घ गाण्यातील हे शेवटले कडवे राजेंद्र यांच्यावर चित्रित झाले होते. राजेंद्र यांनी साजेशा व भावपूर्ण अभिनयाद्वारे संपूर्ण चित्रपटाचे सार सांगून कथानकाला अर्थ प्राप्त करुन दिला व आपला दमदार अभिनय सिद्ध केला.

राजेंद्र कुमार यांनी कधीही चावट चाळे करून नायिकेला त्रास देण्याचा किंवा बीभत्स अभिनय केला नाही. त्यांच्या लाजर्या चेहऱ्यावर खुलणारे मिश्कील पण घायाळ करणारे आगुटते हास्य, चेहऱ्यावरील लाघवी भाव, नायिकेला विश्वास देणारी नेत्राची हलचल ई. भांडवलावर त्यांची प्रेमगीते सात्त्विकतेने खऱ्या प्रेमाची साक्ष देत असे. राजेंद्रकुमार तुली यांचा जन्म २० जुलै १९२९ रोजी सध्या पाकिस्तानात असलेल्या सियालकोट येथे सधन पंजाबी कुटुंबात झाला. वडील कराची येथे टेक्सटाईलचा मोठा व्यापार करायचे. सियालकोट येथे मोठे हवेलीवजा घर होते. फाळणीच्या झळा लागल्यामुळे १९४७ साली हे कुटुंब सर्व मालमत्ता सोडून मुंबईस आले. शुक्ल बहेल यांच्याशी त्यांचा विवाह झाला.

१९४९ साली निर्माता निर्देशक एच. एस. रावल यांनी 'पतंगा' चित्रपटात काम दिले व चित्रपटात प्रवेश झाला. केदार शर्मा या महान निर्माता निर्देशकाची नजर गेली व त्यांनी तत्कालीन गाजलेल्या 'जोगन' चित्रपटात घेतले. १९५५ साली 'वचन' चित्रपटात सर्वप्रथम नायक म्हणून काम मिळाले. व्ही. शांताराम या रत्नपारख्याने त्यांना परखले व बेबी नंदा सोबत 'तुफान और दिया'मध्ये काम केले. रोल लहान असो की महान, अभिनयात व परिश्रमात तडजोड करीत नसल्यामुळे तत्कालीन सर्वच मोठ्या बॅनरच्या चित्रपटात कामे मिळत गेली. १९६० साली बी. आर चोप्रा यांनी 'कानून' चित्रपटात अशोककुमार सोबत वकिलाचा रोल दिला. राजेंद्र यांनी संधीचे सोने केले. मुंबईला बस्तान बसल्यावर कार्टर रोडला मोठे घर घेतले. हाच तो आशीर्वाद बंगला. जो पुढे राजेश खन्ना यांनी विकत घेतला. आजच्या चित्रपटात राजेंद्रकुमारसारख्या नायकाची कल्पनाही करू शकत नाही. ते नंतर निर्माते दिग्दर्शक झाले. मुलगा कुमार गौरवला घेऊन लव्ह- स्टोरी (१९८२) हा चित्रपट काढला. या जुबिली स्टारला एकही पुरस्कार मिळू नये, याची मात्र खंत वाटते. अत्यंत यशस्वी आयुष्य जगणार्या राजेंद्रकुमारला दृष्ट लागली. त्यांना कॅन्सर या दुर्धर आजाराने पछाडले व त्यातच १२ जुलै १९९९ रोजी या जुबिली नायकाचा अंत झाला.

**रमेश पतंगे**

# 'दृश्यम ३'मधून अक्षय खन्नाची एक्झिट



अभिनेता अक्षय खन्ना काही दिवसांपासून 'धुरंधर' चित्रपटामुळे चर्चेत आहे. त्यामध्ये त्यानं साकारलेल्या त्याच्या भूमिकेचं सर्वत्र कौतुक होत आहे. पण, त्यामुळेच अभिनेत्यानं अजय देवगणच्या 'दृश्यम ३'मधून एक्झिट घेतल्याचं म्हटलं जात आहे. 'दृश्यम'च्या निर्मात्यांनी अभिनेत्याच्या एक्झिटबद्दल रोषही व्यक्त केला. 'छावा' व 'धुरंधर'पूर्वी अक्षय खन्नानं 'दृश्यम ३'चे निर्माते कुमार मनगत पाठक यांच्या 'सेक्शन ३८५', 'दृश्यम २' यांसारख्या चित्रपटांत काम केलं आहे. या दोन चित्रपटांमधील अक्षय खन्नाच्या कामाचंही प्रेक्षकांनी कौतुक केलं. या दोन चित्रपटांमध्ये काम करण्यापूर्वी अक्षय खन्ना चार ते पाच वर्षं घरी बसून होता, असं निर्माते कुमार मनगत पाठक एका मुलाखतीत म्हणाले. यावेळी त्यांनी अक्षय खन्नाबद्दल नाराजी व्यक्त करीत, त्याच्या जागी 'दृश्यम ३'मध्ये कोणता अभिनेता झळकणार याबद्दलही सांगितलं. 'खट्टा मीठा', 'राजी', 'रईस', 'बागी ३', 'इक्कीस' यांसारख्या चित्रपटांत भूमिका साकारणारा अभिनेता जयदीप अहलावत आता 'दृश्यम ३'मध्ये अक्षय खन्नाच्या जागी झळकणार असल्याचं चित्रपटाच्या निर्मात्यांनी स्पष्ट केलं आहे. निर्मात्यांनी अक्षय खन्नानं चित्रपटाचं शूटिंग सुरू होण्यासाठी १० दिवस बाकी असताना एक्झिट घेतल्यानं त्याच्यावर कायदेशीर कारवाईसुद्धा करणार असल्याचं म्हटलं. उल्लेख केलेल्या माध्यमाशी संवाद साधताना 'दृश्यम ३'चे निर्माते कुमार मनगत पाठक म्हणाले, आम्हाला आता अक्षय खन्नापेक्षा चांगला अभिनेता आणि महत्त्वाचं म्हणजे एक चांगली व्यक्ती चित्रपटासाठी सापडली आहे. 'दृश्यम'च्या निर्मात्यांनी यावेळी अक्षय खन्नानं 'दृश्यम ३'मध्ये विग लावण्याची मागणी केल्याचे सांगितले. त्यांनी अक्षय खन्नाच्या स्वभावाबद्दलही नाराजी व्यक्त केली. अक्षय खन्नाबद्दल 'दृश्यम ३'चे निर्माते म्हणाले, सेटवर तो खूपच टॉक्सिक वागायचा. अनेकांनी आम्हाला त्याच्याबरोबर काम न करण्याचा सल्ला दिला होता. पण, आम्ही तरीही अक्षयची चित्रपटासाठी निवड केली होती. अक्षय खन्ना कोणीही नसताना मी त्याला 'आर्टिकल ३७५'मध्ये काम करण्याची संधी दिली आणि त्यानंतरच त्याला 'छावा' व 'धुरंधर' यांसारख्या चित्रपटांची ऑफर आली. त्यापूर्वी तीन-चार वर्षं तो घरी बसून होता.

# तुरुंगात संजूबाबा शिव पुराण वाचायचा



संजय दत्त बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेता आहे. सध्या तो 'धुरंधर' चित्रपटामुळे चर्चेत आहे. संजय दत्त व्यावसायिक आयुष्यासह खासगी आयुष्यामुळेही चर्चेत असतो. अभिनेता अनेकदा वादाच्या भोवऱ्यातही अडकला आहे. त्याने तो जेलमध्ये असताना शिवपुराण आणि इतर धार्मिक ग्रंथ वाचायचा, असं म्हटलं आहे. संजय दत्त १९९३ मध्ये झालेल्या हल्ल्यानंतर दोषी ठरल्यानंतर तो ४२ महिने पुण्यातील येरवडा तुरुंगात होता. शिक्षा म्हणून संजय दत्त जवळपास दोन वर्षे तुरुंगात होता. एका मुलाखतीत संजय दत्तने तो तुरुंगात असताना धार्मिक ग्रंथ वाचायचा, अशी माहिती दिली आहे. संजय दत्तला मुलाखतीत तुम्ही भगवद् गीता, महाभारत व कुराण हे सगळं वाचलं आहे, असं ऐकलं ते खरं आहे का? असं विचारल्यानंतर तो म्हणालेला, फक्त एवढंच नाही तर शिव पुराण, गणेश पुराण आणि सगळंच वाचलं आहे. पुढे त्याला तुरुंगात या गोष्टी उपलब्ध असतात का, असं विचारल्यानंतर तो म्हणालेले, मी मागवलं होतं. मी यजुर्वेद, ऋग्वेद हेही वाचलं आहे. संजय दत्तला पुढे त्याला कोणत्या गोष्टीचा राग येतो आणि कोणालाही तुला आनंदी पाहायचं असेल तर काय केल्यान तू आनंदी होतो, असं विचारल्यानंतर तो म्हणाला, मला कोणी खोटं बोलल्यानंतर, कोणी अनादर केल्यानंतर राग येतो; परंतु कोणी फक्त नीट बोललं, माझ्यावर प्रेम केलं तरी मला खूप आनंद मिळतो. आता तर माझा राग खूप कमी झाला आहे. आधी तर ९० च्या काळात खूपच राग यायचा. दरम्यान, संजय दत्त सध्या आदित्य धर दिग्दर्शित 'धुरंधर' चित्रपटामुळे चर्चेत आहे. त्यामध्ये त्यानं अस्लम चौधरी ही भूमिका साकारली आहे. त्यानं त्याच्या भूमिकेनं प्रेक्षकांचं लक्ष वेधलं आहे.

# तर लोक गैरफायदा घेतात!



चित्रपटसृष्टीतील कलाकारांच्या आयुष्यातला झगमगाट पटकन दिसतो. पण यामागे अनेक वर्षांचा संघर्ष असतो. आज कलाविश्वात अनेकांनी आपलं नाव कमावलं आहे. पण यासाठी त्यांना तितक्याच कठीण परिस्थितीला सामोरे जावं लागलं आहे. अभिनेत्री शहनाज गिलनेही आपल्या करिअरमध्ये चढ- उतार अनुभवले आहेत. आज ती ज्या ठिकाणी पोहोचली आहे, तिथपर्यंतचा तिचा प्रवास सोपा नव्हता. या प्रवासातून तिला एक महत्त्वाचा धडा मिळाला, तो म्हणजे सतत काम करत राहणं, सकारात्मक राहणं आणि आपल्या परिस्थितीचा कोणालाही गैरफायदा घेऊ देऊ नये. नो या माध्यमाशी संवाद साधताना शहनाजने हा अनुभव सांगितला. लाइव्ह प्रेक्षकांशी संवाद सुरू असताना एक चाहती भावुक झाली. ती इंडस्ट्रीत ज्युनियर आर्टिस्ट म्हणून काम करत असून तिला वारंवार शोषणाला सामोरं जावं लागत असल्याचं तिने सांगितलं. तिचे अश्रू पाहून शहनाजने तिला धीर दिला आणि मार्गदर्शन केलं. शहनाज म्हणाली की, तिनेही असेच कठीण प्रसंग अनुभवले आहेत. त्या चाहतीला सल्ला देताना शहनाज म्हणाली, तुला स्वतःलाच खंबीर बनायला हवं, स्वतःसाठी उभं राहायला शिकायला हवं आणि लोक काय म्हणतील याचा विचार करू नकोस. अशा गोष्टी सगळ्यांच्या आयुष्यात घडतात. प्रत्येकजण काही ना काही संघर्ष करत असतो. बाहेरून सगळे हसताना दिसतात, अगदी आम्ही कलाकारही पण आतून सगळेच दुखावलेले असतात. लोक ते दाखवत नाहीत. पुढे ती म्हणाली, हे कलियुग आहे. तुम्ही जर तुमचं दुःख उघडपणे दाखवलंत, तर लोक त्याचा फायदा घेण्याचा प्रयत्न करतात. अशा प्रवृत्तीचे लोक खूप आहेत. त्यामुळे भावना आवरून, स्वतःला खंबीर दाखवलंत; तरच तुम्ही पुढे जाऊ शकता. सतत रडत राहिलंत, तर लोक त्याचा गैरफायदा घेतील. शहनाजने हेही स्पष्ट केलं की, आपण स्क्रीनवर जरी दोन मिनिटं दिसलो; तरी त्याचा प्रभाव पडायला हवा. पण तसं घडत नव्हतं. त्यामुळे मी विचार केला की, आधी आपल्या पंजाबी इंडस्ट्रीत काहीतरी अर्थपूर्ण काम करूया. सतत बॉलीवूडच्या मागे धावण्यापेक्षा स्वतःला सिद्ध करणं महत्त्वाचं आहे. मी बॉलीवूडसाठी ऑडिशन्स देत आहे, पण आधी एक चांगली अभिनेत्री म्हणून स्वतःला सिद्ध करणं गरजेचं होतं आणि आता लोक ते ओळखू लागले आहेत, याचा मला आनंद आहे.

# 'डॉन ३'मध्ये दिसणार आता ऋतिक?



अभिनेता रणवीर सिंह 'डॉन ३' मधून बाहेर पडला आहे. धुरंधरच्या यशामुळे त्याने 'डॉन ३' सोडल्याचे मानले जात आहे. यानंतर आता फरहान अख्तर नव्या चेहऱ्याच्या शोधात आहे. डॉन ३ चे निर्माते तातडीने रणवीर सिंगची रिप्लेस्मेंट शोधण्याचा प्रयत्न करत आहेत आणि त्यांनी अभिनेता हृतिक रोशनचाही विचार केल्याचे म्हटले जात आहे. फरहानने हृतिकसोबत याबाबत चर्चा केल्याचेही म्हटले जात आहे. याआधीही ऋतिकला 'डॉन'साठी पसंती दिली गेली होती. पण फरहान अख्तरच्या पहिल्या पसंती असूनही चित्रपट शाहरुख खानच्या हाती लागला होता. आता १९ वर्षांनंतर पुन्हा ऋतिकच्या नावाची चर्चा होत आहे. ऋतिकने यापूर्वी धूम २ सारख्या चित्रपटांमध्ये भूमिका केली आहे. पण, वॉर २ फेम अभिनेता त्याचा जवळचा मित्र फरहान अख्तरच्या आगामी डॉन ३ मध्ये मुख्य भूमिका साकारेल की नाही हे अद्याप निश्चित झालेले नाही. सध्या सोशल मीडियावर फरहान अख्तरने डॉन ३ साठी ऋतिक रोशनला कास्ट केल्याची बातमी तुफान व्हायरल होत आहे. काही म्हणतात की ते अजून यावर चर्चा करत आहेत. काहींचं म्हणणं आहे की त्यांना त्यांचा नवा डॉन सापडला आहे. इंडस्ट्रीचे 'ग्रीक गॉड' म्हणून ओळखले जाणारे ऋतिक रोशन या भूमिकेसाठी परफेक्ट चॉइस आहेत. आता डॉन ३ मध्ये ऋतिक रोशन दिसतील की नाही हे तर येणारा वेळच सांगेल. डॉन फ्रँचायझीच्या मागील दोन भागांमध्ये मेगा सुपरस्टार शाहरुख खानने डॉनची भूमिका साकारली होती. पण, त्याऐवजी रणवीर सिंगला डॉन ३ मध्ये कास्ट केले गेले होते, मात्र आता रणवीरनेही हा चित्रपट सोडला आहे. याआधी अभिनेत्री कियारा अडवाणीने यापूर्वी गरोदरपणामुळे डॉन ३ मधून बाहेर पडून प्रमुख फ्रँचायझी सोडली होती.